## नियमित दिवाणी दावा क्रमांक ५४१/२०२४ मधील नि.क्र.४६ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ व ३ ते ७ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यावर दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर दाव्याकामी हजर होऊन निशाणी ५ च्या अर्जावर म्हणणे दाखल केले व कैफियत देणेस मुदत मागितली होती. प्रतिवादी ३ व ५ ते ७ या सासरी नांदत असल्यामुळे मुलांच्या व संसाराच्या व्यापातून त्यांना कैफियत मुदतीत देता आली नाही. प्रतिवादी क्र. १, ३व ५ ते ७ यांनी प्रतिवादी क्र. ४ च्या लाभात कुलमुखत्यारपत्र करुन दिले होते व आहे. परंतु, प्रतिवादी क्र. ४ हे वयोवृध्द असून आजारी असल्यामुळे डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला होता. तसेच, प्रतिवादी क्र. ४ यांना दावा मिळकतीची महत्त्वाची कागदपत्रे हे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफियत सुनावणीचा आदेश झाला आहे. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास ८ महिने १० दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब, प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत दाखल करण्यास मिळावी अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी सदर अर्जास हरकत घेतली. वादीचे म्हणण्यानुसार, अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. अर्जातील कारण कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिपक्षाच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी मागणी केल्यानुसार विलंब माफ होण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### का र ण मि मां सा

४. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा दिनांक ०३.१०.१९८९ रोजीचे व दिनांक ०४.१०.२००७ रोजीची खरेदीखते बंधनकारक नसल्याचे व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. अर्जातील कथनांवरुन प्रतिवादींना कैफियत अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादमुद्दा गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादींची लेखी कैफियत अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने संयुक्तिक आहे. प्रतिवादींवर खर्च बसवून संधी देणे योग्य राहिल. सबब मुद्दा नं.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

### आ दे श

१. अर्ज रक्कम रुपये ३००/- प्रतिवादींनी वादीस खर्च म्हणुन देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरुध्द कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.04 17:38:32 +0530

( व्ही. बी. घाडगे )

दिनांकः- ०३.१०.२०२५

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.